सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक १०१९(१)/२०२०/२४** **दिनांक:- १४ ऑक्टोबर, २०२१**

# सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा- २०२०

## जाहिरात क्र. ०२/२०२०

## -:प्रसिध्दीपत्रक :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक १५ मार्च, २०२० रोजी आयोजित सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा-२०२० च्या दिनांक २४ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निकालासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ७१८/२०२१ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या आदेशानुसार विषयांकीत परीक्षेचा सुधारित निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. पूर्व परीक्षेच्या अर्जाव्दारे उमेदवारांनी दिलेल्या माहिती/तपशीलाच्या आधारे उमेदवारांची पात्रता नंतरच्या टप्प्यावर तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या सुधारित निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात आले आहे.

३. सुधारित निकालाच्या आधारे नव्याने पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. खेळाडूसाठी आरक्षित पदाकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या क्रीडाविषयक दाव्यांची/कागदपत्रांची वैधता तपासण्याच्या अधीन राहून मुख्य परीक्षेकरीता केवळ तात्पुरता प्रवेश देण्यात आला आहे.

५. सुधारीत निकाल विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहिर करण्यात आला आहे.

६. सुधारित निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाव्दारे कळविण्यात येईल.

७. मुख्य परीक्षा शनिवार **दिनांक २० नोव्हेंबर, २०२१** रोजी आयोजित करण्यात येईल.

८. सुधारित निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांकरीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यात येईल व त्याप्रमाणे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**ठिकाण:- मुंबई**

**उपसचिव, (प. अ.)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**